## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण वापराबाबत मार्गदर्शक सूचना

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील सामाजिकशास्त्र विभागाने युनिसेफच्या (UNICEF) मदतीने महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांना 'आपत्ती व्यवस्थापनाचे' प्रशिक्षण देण्यासाठी तीन प्रकारचे मुद्रित साहित्य तयार करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापन वाचन साहित्य, आपत्ती व्यवस्थापन घटकसंच, आपत्ती व्यवस्थापन कृतिपुस्तिका.

- आपत्ती व्यवस्थापन वाचन साहित्य पुस्तिका ही शालेय स्तरावरील सर्व स्तरांसाठी एकच आहे. आपत्तीचे मुख्य प्रकार, उपप्रकार, त्याची कारणे, आपत्ती येण्यापूर्वी, आपत्ती आल्यानंतर काय करावे व आपत्तीनंतर जागरूक राहून काय करणे अपेक्षित आहे याविषयीचे विवेचन या पुस्तिकेत केले आहे.
- शिक्षकांनी या पुस्तिकांचा उपयोग 'शिक्षक मार्गदर्शिका' म्हणून करणे अपेक्षित आहे. शिक्षक ज्या स्तराला अध्ययन-अध्यापन करत असतील त्या स्तरासाठी या पुस्तिकेत दिलेल्या आपत्तींविषयी कोणते व कसे अध्ययन अनुभव देता येतील याची दिशा मिळण्यासाठी ही पुस्तिका मार्गदर्शक आहे.
- प्रशिक्षण घटकसंच पायाभूत व पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक व माध्यमिक स्तर या दोन पुस्तिकेमध्ये चारही स्तरांच्या शिक्षकांसाठी स्वतंत्र आहेत.
- प्रशिक्षणात सुलभक म्हणून कार्य करणाऱ्या शिक्षकांसाठी ही पुस्तिका उपयोगी ठरणार आहे.
- प्रशिक्षण देताना कोणते अनुभव व ते कसे द्यावेत, कोणती प्रात्यक्षिके व कशी करून घ्यावीत, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यंत आपत्ती व्यवस्थापनाची माहिती कशी देता येईल याविषयीचे नियोजन या पुस्तिकेत दिले आहे.
- विद्यार्थी कृतिपुस्तिकेमध्ये स्तरनिहाय माहिती देण्यात आलेली असून प्रत्येक स्तराच्या विद्यार्थ्यांकडून विविध आपत्तींविषयी कोणत्या कृती व कशा करून घेता येतील याविषयीची माहिती देण्यात आली आहे.
- ही कृतिपुस्तिका विद्यार्थ्यांसाठी आहे. मुलांनी त्यातील कृती स्वत:, मित्रांच्या मदतीने किंवा शिक्षकांच्या मदतीने पूर्ण करणे अपेक्षित आहे.
- कृती कोणत्या प्रकारची आहे. ती कशी व केव्हा करून घ्यायची याचे नियोजन शिक्षकांनी केले पाहिजे.
- 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत या कृतींचे वेळापत्रक शाळा व वर्ग स्तरावर तयार करून कृती घेतल्या जाव्यात. काही प्रात्यक्षिके सुचवली आहेत. ती शिक्षकांच्या उपस्थितीत व त्यांच्या निरीक्षणाखालीच करण्यात यावीत.
- तसेच यामध्ये काही क्यूआर कोड देण्यात आले आहेत. एखाद्या आपत्तींविषयी अधिक सखोल माहिती पीडीएफ तसेच ध्वनिचित्रफीतीच्या स्वरूपात उपलब्ध होणार आहे. त्यांचा योग्य वेळी उपयोग करून आवश्यक तेथे ध्वनिचित्रफीत दाखवावी.
- तीनही पुस्तिकांचा उपयोग करून आपत्तींना सामोरे कसे जावे, आपत्कालीन स्थितीत माझी भूमिका काय असेल, काय करावे व काय करू नये, प्रथमोपचार कसे करावे या सर्व बाबी मुलांपर्यंत पोहोचवता येतील.

शालेय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी आपणा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!